Please consider the environment before printing…

दिनांक:- 15 / 08 / 2024

S.N.D. POLYTECHNIC, BABHAULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

# Indian Independence Day 2024

## भारतीय स्वातंत्र्य दिवस

Jagdamba Education Society's



**15 AUGUST 1947**

भारतीय स्वातंत्र्य दिवस हा दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सुट्टी म्हणून भारतात साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी युनायटेड किंग्डमपासून देशाच्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून या दिवसाचे महत्त्व आहे. याच दिवशी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ च्या तरतुद लागू होऊन भारतीय संविधान सभेला वैधानिक सार्वभौमत्व प्राप्त झाले होते.

भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. २६ जानेवारी १९५० रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो) भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते.

स्वातंत्र्यानंतर धार्मिक आधारावर भारताची फाळणी झाली, ज्यामध्ये ब्रिटिश भारत हा भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागला गेला. फाळणीनंतर हिंसक दंगली झाल्या तसेच मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. धार्मिक हिंसाचारामुळे जवळपास १.५ कोटी लोकांनी स्थलांतर केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे

पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राजधानी दिल्ली येथील लाल किल्ल्याच्या लाहोरी गेटवर भारतीय राष्ट्रध्वज फडकावला. त्यानंतरच्या प्रत्येक स्वातंत्र्यदिनी विद्यमान पंतप्रधान परंपरेने लाल किल्ल्यावर ध्वज फडकावतात आणि राष्ट्राला संबोधित करतात. हा संपूर्ण कार्यक्रम भारताचा राष्ट्रीय प्रसारक असलेल्या दूरदर्शनद्वारे प्रसारित केला जातो. हा कार्यक्रम शक्यतो उस्ताद बिस्मिल्ला खान यांच्या सनई संगीताने सुरू होतो.

संपूर्ण भारतामध्ये स्वातंत्र्य दिन हा ध्वजारोहण समारंभ, परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे भारताची राष्ट्रीय सुट्टी असते.

## इतिहास:

Jagdamba Education Society's

इ.स. १७७० पासून भारतावर इंग्रजांचे राज्य होते. १९व्या शतकापासूनच सर्व राज्यांना इंग्रजांनी आपल्या सैन्यबळावर ताब्यात ठेवले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिशांनी त्यांची व्यवस्था अजूनच शिस्तीची केली. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.



**Figure 1**

स्वातंत्र्य दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेची सजावट. चित्र: १४ ऑगस्ट २०१६, मुंबई

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना लक्षात आले की, आपल्याला भारतावरचे राज्य व युद्ध हे सांभाळता येणार नाही आहे. तसेच दुसऱ्या बाजूला भारतीय क्रांतिकारकांचा जोर वाढत होता. ही गोष्ट कळल्यानंतर ब्रिटनच्या पंतप्रधानांनी जून १९४७ पर्यंत भारत पूर्णपणे स्वतंत्र करण्याची हमी दिली. अखेर दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण त्यावेळी भारताचे पाकिस्तान आणि भारत असे दोन तुकडेही पडले. पाकिस्तानी भागात राहणाऱ्या अनेक पंजाब्यांना व सिंधींना त्यांचे घरदार, पैसा सोडून यावे लागले. अनेक लोक ह्यामध्ये मारलेही गेले. पुढे ह्या विभाजनामुळे काश्मीरचा प्रश्नही पुढे आला.

## स्वतंत्र भारत

स्वतंत्र भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा मोलाचा वाटा होता. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते.


The Hindustan Times

INDIA INDEPENDENT : BRITISH RULE ENDS

CONSTITUENT ASSEMBLY TAKES OVER

COLOURFUL CEREMONY MARKS BIRTH OF NATION

Governors Sworn In As Free India Is Born

Figure 2

हिंदुस्तान टाइम्सचा १५ ऑगस्ट १९४७ रोजीचा अंक

रवींद्रनाथ टागोर ह्यांनी लिहिलेले जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत[ तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय ह्यांनी लिहिलेले वन्दे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले.

## स्वातंत्र्य दिनाचा उत्सव:

स्वातंत्र्य दिन हा भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक असतो. (इतर दोन म्हणजे २६ जानेवारी-प्रजासत्ताक दिन आणि २ ऑक्टोबर- महात्मा गांधींचा जन्मदिन.) हा दिवस सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती "राष्ट्राला संबोधित" करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात . आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात. " जन गण मन " हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते. अशाच घटना राज्यांच्या राजधानीत घडतात जेथे वैयक्तिक राज्यांचे मुख्यमंत्री राष्ट्रध्वज फडकवतात, त्यानंतर परेड आणि स्पर्धा होतात. 1973 पर्यंत राज्याचे राज्यपाल राज्याच्या राजधानीत राष्ट्रध्वज फडकावत असत. फेब्रुवारी १९७४ मध्ये, तामिळनाडूचे मुख्यमंत्री, एम. करुणानिधी यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे हा मुद्दा उचलून धरला की पंतप्रधानांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनाही स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी देण्यात यावी. १९७४ पासून संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी आहे.



Figure 3

भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला पंडित जवाहरलाल नेहरू त्यांचे ट्रीस्ट विथ डेस्टिनी हे जगप्रसिद्ध भाषण देताना.

ध्वजारोहण समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रम देशभरातील सरकारी आणि निमसरकारी संस्थांमध्ये होतात. शाळा आणि महाविद्यालये ध्वजारोहण समारंभ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. सरकारी आणि गैर-सरकारी संस्था त्यांचे परिसर कागदाने सजवतात, फुग्याने त्यांच्या भिंतींवर स्वातंत्र्यसैनिकांच्या चित्रांची सजावट करतात आणि मोठ्या सरकारी इमारती अनेकदा दिव्यांच्या तारांनी सुशोभित केल्या जातात. दिल्ली आणि इतर काही शहरांमध्ये पतंगबाजीने या प्रसंगात भर पडते. देशाप्रती निष्ठेचे प्रतीक म्हणून विविध आकारांचे राष्ट्रीय ध्वज मुबलक प्रमाणात वापरले जातात. नागरिक त्यांचे कपडे, मनगटी, कार, घरगुती उपकरणे तिरंगी प्रतिकृतींनी सजवतात. कालांतराने, या उत्सवाने राष्ट्रवादापासून भारतातील सर्व गोष्टींच्या व्यापक उत्सवात बदल केला आहे.

अनिवासी भारतीय हे जगभरातील स्वातंत्र्य दिन हा परेड आणि विविध स्पर्धांसह साजरा करतात. विशेषतः भारतीय स्थलांतरितांची संख्या जास्त असलेल्या प्रदेशांमध्ये हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. काही ठिकाणी, जसे की न्यू यॉर्क आणि इतर यूएस शहरांमध्ये, 15 ऑगस्ट हा अनिवासी भारतीयां साठी आणि स्थानिक लोकांमध्ये "भारत दिन" बनला आहे. तर काही ठिकाणी १५ ऑगस्टला किंवा त्याच्या लगतच्या वीकेंडच्या दिवशी "इंडिया डे" साजरा करतात.

लाल किलल्यावर स्वातंत्र्यदिन उत्सव भारतात सर्व ठिकाणी स्वातंत्र्य दिनाची सार्वजनिक सुट्टी दिली जाते. सर्व शाळा, महाविद्यालये-कार्यालयांमध्ये ध्वजारोहण व ध्वजवंदन असते. भारताचे पंतप्रधान हे दरवर्षी भाषण देतात. या दिवशी लाल किल्ला येथे भारताचे पंतप्रधान ध्वजारोहण करतात. त्यादिवशी बहुतांश रेडिओ केंद्रावर तसेच दूरदर्शनवर देशभक्तिपर गाणी, कार्यक्रम, चित्रपट लागतात.

## अमृत महोत्सव:

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव २०२२ साली देशभरात साजरा झाला. या दिवसाचे विशेष औचित्य साधून देशभरात विविध सामाजिक, ऐतिहासिक उपक्रम राबविण्यात आले होते.



S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401